**प्रेस नोट** **दिनांक ०४/११/२०२६**

दक्षिण सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई यांनी Share Trading Investment Fraud या सायबर गुन्हयामध्ये, 3 आरोपींना नागपूर येथून अटक करुन मुंबईतील ०६ व एकूण ७३ गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याबाबत.

.....

दिनांक १०/०६/२०२६ ते दिनांक ०८/०९/२०२६ दरम्यान, महिला नामे मिरा आयर आणि त्यांचे साथीदार यांनी फिर्यादी यांना Share Trading Investment च्या माध्यमातून अधिक नफा मिळेल असे सांगून, फिर्यादींना विविध बॅंक खातेत एकूण ५८,७२,४१०/- अशी रक्कम विविध बॅंक खात्यामध्ये भरण्यास सांगून फिर्यादी यांची फसवणूक केल्याने, दक्षिण सायाबर पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक ०९/०९/२०२६ रोजी , गु.नों.क्र. ७९/२०२६, कलम ३१८(४), ३१९(२), ३३८, ३४०, ६१(२) भा.न्या.सं. सह कलम ६६(क), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयाच्या तपासामध्ये फिर्यादींची फसवणूक झालेल्या एकूण रकमेपैकी रु. २४,७५,०००/- इतकी रक्कम सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, जरीपटका शाखा, नागपूर या बॅंकेतील ग्रेन गार्डन डिलाईटस् प्रा.लि. या कंपनीच्या नावे असलेल्या चालू खाते क्र. ५९३३९४३५९६ यामध्ये वळती करण्यात आल्याचे दिसून आले. तांत्रिक विश्लेषण आणि नॅशनल सायबर क्राईम पोर्टलवरील माहितीच्या आधारे, सदर बॅक खातेधारक आरोपीचा नागपूर येथे शोध घेतला असता, दिनांक ०२/११/२०२६ रोजी नमुद गुन्हयाच्या सुत्रधारासह ०३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.आरोपींनी संगनमत करुन, आरोपी अनिरुद्ध उके आणि मुख्य सुत्रधार आरोपी अमित दिलीपराव काळे यांनी आरोपी नामे रितीक शैलेश धारगावे याच्या नावे ग्रेन गार्डन डिलाईटस् प्रा.लि. कंपनी स्थापन केली. सदर कंपनी स्थापन करण्यासाठी खोटे भाडे करारनामा केला. मुख्य सुत्रधार आरोपी नामे अमित दिलीपराव काळे याने आरोपी साथीदार नामे रितीक धारगावे याच्या नावे असलेला मोबाइल क्र. ९२७०३५११७९४ स्वत:च्या POCO C75 5G (Xiaomi) मोबाइल डिव्हाईस (IMEI 86477408548772 864774085487739 ) लॉग इन करुन वापरुन फसवणूकीचे व्यवहार पार पाडण्यासाळी नमुद मोबाइल क्रमांक अन्य साथीदारांना देवून फसवणूकची रक्कम ऑनलाईन वळती केल्याचे दिसून आले आहे.

**अटक आरोपीकडून खालील मुद्देमाल जप्त केला आहे** -

१) ११ वेगवेगळया बॅंक खात्यांचे जप्त केलेले चेकबुक्स व पासबुक्स
२) २५ विविध कंपन्यांचे सिम कार्डस्
३) ११ बनावट कंपन्यांचे रबर स्टॅम्प्स् आणि ०३ स्टॅम्प पॅडस्
४) डेबिट/एटीएम कार्डस्, क्यूआर कोड
५ ) बनावट कंपन्यांची कागदपत्रे व पॅन कार्डस्

**अटक आरोपी नावे -**

१) अमित दिलीपराव काळे, वय - ३४ वर्षे, प्लॉट क्र. १८, वाटोडा रोड, चैत्येन्यश्वर नगर, वाटोडा, नागपूर ४४००३५
२) रितीक शैलेश धारगावे, वय - २५ वर्षे, न्यु इंदौरा रिपब्लीकन नगर, लाईन नं. २, जरीपटका, नागपूर ४४००१४
३) अनिरुद्ध सतीश उके, वय - ३० वर्षे, प्लॉट क्र. ३५६४ ए/१, बुद्धगया बुद्धविहार जवळ, सरस्वती नगर, जरीपटका, नागपूर,

नमुद गुन्हयातील मुख्य सुत्रधार आरोपी आणि त्याचे अन्य ०२ साथीदार यांना अटक करण्यात दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई यांना यश आले आहे. सदरची प्रशंसनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री.अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (सायबर) श्री. बजरंग बनसोडे, मा. सहायक पोलीस आयुक्त श्री सायरस इराणी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नंदकुमार गोपाळे, पो.नि. बागवान, स.पो.नि. रामदास गोपाळ व पो.शि. १४२७०५/गोरख पारेकर, पो.शि. १९००२२/मंगेश गायकवाड या पथकाने यशस्वीरीत्या पूर्ण केली.

**नागरीकांना अवाहन करण्यात येते की, अनोळखी नंबरच्या व्हाटस्ॲप वर संपर्क करणा-या व्यक्तींवर विश्वास ठेवून, त्यांनी सांगितल्याप्रमाणे, कोणत्याही प्रकारचे शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करु नये. जर आपली फसवणूक झाली असल्यास १९३० वर त्वरीत संपर्क साधावा.**